


# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७९ वा ❑ मंगळवार दि.०२ सप्टेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

## कर्करोग एक जीव घेणा आजार

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

कॅन्सर हा एक गंभीर आजार असून या आजाराने करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी न होता वाढतच आहे. नुकतंच मराठी चित्रपट सृष्टीतील. प्रिया मराठे.या चित्रपट अभिनेत्रीचा दुर्दैवी मृत्यू झाला.पवित्र रिश्ताया मालिकेत वर्षा ही भूमिका साकारणारी मराठी अभिनेत्री प्रिया मराठे यांचे वयाच्या ३८ व्या वर्षी निधन झाले. प्रिया गेल्या दोन वर्षांपासून कर्करोगाशी झुंज देत होती पण ३१ ऑगस्ट रोजी ती ही लढाई हरली. कर्करोगापासून जीव वाचवण्यासाठी या आजाराचे लवकर निदान होणे महत्त्वाचे आहे.म्हणून या आजाराबाबत सावधगिरी बाळगलेली बरी.

जगभरात कर्करोगाचे रुग्ण सतत वाढत आहेत आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्याही भयावह होत आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या अलीकडील अभ्यासातून असे दिसून आले आहे की भारतात कर्करोगाचे निदान झाल्यानंतर ५ पैकी ३ लोक आपला जीव गमावतात. चिंताजनक बाब म्हणजे पुढील २५ वर्षांत मृत्युदरात मोठी वाढ होऊ शकते. २०५० पर्यंत भारतात कर्करोगाचा मृत्यूदर १०९% पर्यंत पोहोचू शकतो अशी भीती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. जर असे झाले तर या आजाराने मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या खूप जास्त असू शकते.

आयसीएमआरच्या नवीन अभ्यासात असे म्हटले आहे की भारतात कर्करोगाच्या सुमारे ६५% रुग्णांचा मृत्यू होतो. हा आकडा खूप जास्त आहे, कारण चीनमध्ये कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्युदराचे प्रमाण ५०% आहे आणि अमेरिकेत तो २३% आहे. त्या तुलनेत, भारतात, कर्करोगाचे निदान झाल्यानंतरही, दर ५ पैकी ३ लोक आपले प्राण गमावत आहेत. आयसीएमआरचा हा अभ्यास द लॅन्सेट रीजनल– साऊथईस्ट एशिया जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे. जगात चीनमध्ये कर्करोगाच्या रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. या यादीत अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि भारत तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात दरवर्षी लाखो लोक कर्करोगामुळे मरतात. हा आकडा सतत वाढत आहे.

आयसीएमआरचा हा अभ्यास ग्लोबोकॅन २०२२ मधील डेटाच्या विश्लेषणावर आधारित आहे. हा १८५ देशांमधील कर्करोगाचा डेटा प्रदान करणारा एक ऑनलाइन डेटाबेस आहे. आयसीएमआर म्हणतो की मुले (०–१४ वर्षे) आणि तरुण वयात (१५–४९ वर्षे) कर्करोग होण्याचे प्रमाण ०.१% ते २.३% आहे. यातून होणाऱ्या मृत्युदरात ०.०८% ते १.३% इतका फरक आहे. मध्यमवयीन (५०–६९ वर्षे) आणि वृद्धांमध्ये (७० वर्षे किंवा त्याहून अधिक) कर्करोग होण्याचा धोका ८.३% ते १०.३% आहे. यातून होणाऱ्या मृत्युदरात ५.५% ते ७.६% इतका फरक आहे. गेल्या दोन दशकांत भारतात कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्युदरात वाढ होत असल्याचेही अभ्यासात म्हटले आहे.

येत्या काळात कर्करोगाचे रुग्ण आणि मृत्युदर वाढतच राहतील अशी भीती शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे. २०२२ ते २०५० पर्यंत मृत्युदर ६४.७ वरून १०९.६ पर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. येत्या काळात भारताला कर्करोग नियंत्रणात मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल असा इशारा आयसीएमआरने दिला आहे. कर्करोग आणि मृत्युदराच्या वाढत्या घटना लक्षात घेता, २०२५–२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात, सरकारने देशातील सर्व ७५९ जिल्ह्यांमध्ये डे केअर कर्करोग केंद्रे स्थापन करण्याची योजना आखली आहे, जिथे केमोथेरपी, आवश्यक औषधे आणि बायोप्सी सेवा पुरविल्या जातील.

कॅन्सर हा एक गंभीर आजार आहे, ज्यामध्ये शरीरातील पेशी अनियंत्रितपणे वाढू लागतात आणि ट्यूमर तयार करतात. वेळेवर निदान आणि उपचार केल्यास कॅन्सरवर मात करणे शक्य आहे, त्यामुळे या आजाराची लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

कर्करोगासारख्या प्राणघातक आजाराचे नाव ऐकूनच आपण घाबरतो, पण घाबरण्यापेक्षा आपण त्याबद्दल सावधगिरी बाळगली पाहिजे. हा आजार जितक्या लवकर आढळेल तितकाच यशस्वी उपचार होण्याची शक्यता जास्त असते. म्हणूनच, कर्करोगाच्या काही सुरुवातीच्या लक्षणांकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. तथापि, ही लक्षणे इतकी किरकोळ दिसतात की लोक अनेकदा त्याकडे दुर्लक्ष करतात, जी नंतर घातक ठरू शकतात. कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे कोणती आहेत ते जाणून घेऊया.

जास्त आणि सतत येणारा थकवा:

सामान्य थकवा विश्रांती किंवा झोपेने बरा होतो. परंतु जर तुम्हाला कोणतेही विशेष काम न करता सतत थकवा जाणवत असेल आणि विश्रांती घेतल्यानंतरही थकवा कमी होत नसेल तर ते चिंतेचे कारण असू शकते. रक्त कर्करोग, कोलन किंवा पोट कर्करोगात, शरीरात अनेकदा लाल रक्तपेशींची कमतरता असते, ज्यामुळे शरीराच्या प्रत्येक भागापर्यंत ऑक्सिजन योग्यरित्या पोहोचू शकत नाही आणि खूप थकवा येतो.

शरीरात कुठेही सूज किंवा गाठ:

शरीराच्या कोणत्याही भागात, विशेषतः स्तन, अंडाशय, मान, काखेत किंवा मांडीत नवीन गाठ किंवा सूज येणे ही कर्करोगाची सर्वात सामान्य चेतावणी आहे. जर ही गाठ कालांतराने वाढत असेल, कठीण असेल किंवा स्पर्श केल्यावर हलत नसेल, तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांकडून तपासणी करून घ्यावी. जरी प्रत्येक गाठ कर्करोगाची नसली तरी, काळजी घेणे महत्वाचे आहे.

वारंवार ताप किंवा संसर्ग:

जर तुम्हाला कोणत्याही कारणाशिवाय वारंवार ताप येत असेल किंवा तुम्हाला सहजपणे संसर्ग होत असेल, तर ते तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत असल्याचे लक्षण असू शकते. ल्युकेमिया किंवा लिम्फोमा सारखे कर्करोग शरीराच्या रोगप्रतिकारक पेशींवर परिणाम करतात, ज्यामुळे शरीर रोगांशी लढण्यास असमर्थ असते.


दीर्घकाळापर्यंत वेदना: शरीराच्या कोणत्याही भागात तीन–चार आठवड्यांपेक्षा जास्त काळ वेदना होणे, जे सामान्य वेदनाशामक औषधांनी देखील कमी होत नाही, ते कर्करोगाचे लक्षण असू शकते. उदाहरणार्थ, सतत डोकेदुखी हे ब्रेन ट्यूमरचे लक्षण असू शकते, पाठदुखी हे कोलन किंवा गर्भाशयाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते आणि छातीत दुखणे हे फुफ्फुसाच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.

कोणत्याही प्रयत्नाशिवाय वजन कमी होणे:

जर तुम्ही डाएटिंग किंवा व्यायाम न करता ४–५ किलो वजन कमी केले असेल तर ते खूप धोकादायक आहे. हे बहुतेकदा कर्करोगाचे प्रारंभिक लक्षण असते. कर्करोगाच्या पेशी शरीराच्या चयापचयवर परिणाम करतात, ज्यामुळे वजन वेगाने कमी होऊ लागते.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये 'ऑपरेशन सिंदूर विजय' थीमची धूम



ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर (सुधीर कोर्टीकर)** गणेशोत्सवाचे औचित्य साधत कुलस्वामिनी प्रतिष्ठान गणेश मंडळ तर्फे आगळीवेगळी व राष्ट्रभक्तीने परिपूर्ण अशी थीम सादर केली आहे . 'ऑपरेशन सिंदूर विजयत्सव यात्रा'. हा देखावा भारतीय सैन्याच्या शौर्यगाथेवर आधारित असून, ''ऑपरेशन सिंदूर विजय'' च्या माध्यमातून देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली आहे. अत्याधुनिक लाईटिंग, ध्वनी–प्रभाव,युद्ध प्रसंगांचे सजीव देखावा युद्धभूमीचा थरार व यात्राचे स्वरूप,यामुळे हा देखावा प्रत्यक्ष कुटुंबासह पाहावा असा आहे.''देशभक्ती आणि श्रद्धा यांचा सुंदर संगम साधणारा हा देखावा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल,'' असे मत मंडळाचे आहे.

''जाऊ या गणेश जत्रेला ! कुलस्वामिनीला गेली १६ वर्षापासुन सतत नाविन्यपूर्ण, सामाजिक, सांस्कृतिक, लोकोपयोगी, अनेक पुरस्कार प्राप्त भव्य इको फ्रेंडली देखावा करणारे एकमेव मंडळ असुन मंडळाचे हे सतरावे वर्ष आहे. या वर्षीचा देखावा पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे.

देखाव्याची माहिती–भारत पाकिस्तानचा हा देखावा २५ बाय २५ फूट असा भव्य आहे. यामधे भारत नकाशा १५ फुट मोठा असुन भारतमाता ६ फुट दाखवण्यात आली आहे. बाजूस इंडिया – पाकिस्तान बॉंड्री व रनगाडी, युद्ध नौका, पाणबुडी, युद्ध नौका, मिसाईल, मिल्ट्री तैनात असल्याचे दाखवले असुन त्या बॉंड्री पलीकडे पाकिस्तान नकाशा ५ फुट मधे आहे; ज्या मधे सिंदूर ऑपरेशन करून उध्वस्त केलेले नऊ ठिकाण सुबकरीतीने दाखवले आहे.

हा एक भारताचा मोठा विजय आहे; त्या मुळे प्रत्येक भक्त, भारताचा जयजयकार करत मिनी ट्रेन मधे हातात तिरंगा घेत भारताच्या भोवती जयघोष करतात, अशी व्यवस्था देखाव्यात केली आहे.

आतंकवादी बंकर, तळघर १० फुट रुंद व ६० फुट लांब असुन त्यामधे आतंकवादी लपल्याचे दाखवण्यात आले आहे. या आतंकवाद्याना प्रत्येक भाविकाकडून बंदुक ने गोळी मारता येईल व अंधार कोठडीतील जिवंत आतंकवादीला गुद्दे, काठी मारता येईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

वापरलेले साहित्य–१५० रिकामी टाकाऊ पोत्याची गोणी,सीमेंट ६ बैग,१० लिटर रंग,१० लाकडी शीट,शेततळ्याची पन्नी ३० फूट काही भंगार,टाकाऊ साहित्य, बैलगाडी बैल सजावटसह, पताका १२०० फुट, लाकडी बांबू ८०यात्रेतील खेळ–२० फ ूटी राउंड ट्रेन,२० फूट ट्रॅम्पलिंग, कट पुतळी, शूट बंदूक चार ,मुलांसाठी १५ फुट कृत्रीम तलाव व त्या मधे दोन बोटी,रिंग गेम,सजवलेली बैलगाडी.

महाराष्ट्रात प्रथमच गणेश उत्सवात यात्रेचे स्वरूप देणारे एकमेव मंडळ. दोन आठवड्या पासून १५ मंडळाचे सदस्य एकत्र येत काम करत होती सजवण्यात आलेल्या बैल जोडी व बैलगाडी तून लहान थोर याना बसवून ''चला जाऊ यात्रा''साठी सफर ची व्यवस्था! आनंद व्यवत करणेस जोकर, वासुदेव अन कठपुतळी तसेच भेळ, पाणीपुरी, आईसक्रीम याचा प्रत्येक भक्तास शिस्तबद्ध अल्पोपहार आहे.

आठ फुटी स्क्रीन वर पहलगाम हल्ला व सिंदूर ऑपरेशन विषयी बोलपट.गणेश विसर्जन दिवशी

विसर्जन करणेसाठी परिसरातील

नागरिकांना,खेळण्यास तयार करण्यात आलेला कृत्रिम तलाव वापरणार !२ फुट सजवलेली शाडू मातीची मुर्ती !

हा भव्य देखावा पाहण्यास व आतंकवादी याना बंदुकीने गोळी मारून ठार मारण्यास व राष्ट्र प्रेम व्यक्त करण्यास अध्यक्ष विलास कोरडे यांनी आवाहन केले आहे.

स्थळ–कुलस्वामिनी मंगल कार्यालय,एन६,सिडको.वेळ–सायंकाळ ६ ते १०

# नांदेड सिटीत भव्य मेगा हेल्थ चेक अप कॅम्पचे यशस्वी आयोजन




ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – नांदेड सिटी येथील गणेशोत्सवात दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा दिनांक ३१/०८/२५, रविवार सकाळी १० ते १ वाजेपर्यंत अम्फिथिएटर (गणेश मंडप) येथे भव्य निशुल्क संपूर्ण आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जनरल हेल्थ, स्त्रीरोग, बालरोग नेत्ररोग, ऑर्थोपेडिक, फिजिओथेरपी, डायबिटीस, प्रकृती चिकित्सा, होमिओपॅथी, आयुर्वेद, दंतचिकित्सा, आहार व्यवस्थापन, बालरोग, त्वचारोग कान नाक व घसा यावर तज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला व मार्गदर्शन देण्यात आले सोबतच काही पॅथॉलॉजिकल टेस्ट व तपासण्या सहयोग पॅथॉलॉजी लॅब आणि स्टार पॅथॉलॉजी लॅब तर्फे निशुल्क करण्यात आल्या. शिबिराचे उद्घाटन सत्राचे सूत्रबद्ध संचलन रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. शिरीष पाटील यांनी केले. दीप प्रज्वलन मान्यवरांचे हस्ते झाले. रेसिडेन्शियल डॉक्टर्स असोसिएशन ऑफ नांदेड सिटीचे अध्यक्ष डॉ. अनिल दूधभाते यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी विशेष अतिथी श्री समीर जाधवराव, सुधीर काळकर, ब्रह्माकुमारी श्रीमती ललिता दीदी, नांदेड सिटीचे संचालक सुजित कारले यांनी शिबीर आयोजनाबद्दल गौरवोद्गार काढले. नांदेड सिटी सेवा कार्यात अग्रेसर जुने जाणते कार्यकर्ते स्व. सतीश कुलकर्णींच्या पावन स्मृतीस सदर शिबिर समर्पित करण्यात आले. या शिबिरात एकंदर ३० डॉक्टरांनी आपला सहभाग नोंदविला. शिबिर सुरू असताना रुग्णांच्या विविध प्रश्नांना तज्ञ डॉक्टरांनी उत्तरे दिली या प्रश्नोत्तराच्या सत्राचे संचालन डॉ. ऋषिकेश दामले आणि डॉ. वैशाली गोमसळे यांनी केले. जवळपास २७५ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. सदर शिबिराचे आयोजन रामराज्य ज्येष्ठ नागरिक संघ आणि रेसिडेन्शिअल डॉक्टर असोसिएशन ऑफ नांदेड सिटी यांनी संयुक्तपणे केले होते. सदर शिबिराला मराठवाडा मित्रपरिवार आणि डॉ.काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शिबिराचे यशस्वीतेसाठी डॉ. विकास शिरसागर, डॉ.हरीश गोरे, डॉ. वैशाली गोसावी, डॉ.मीनाक्षी रोंघे, श्री. रविजी कल्याणी, श्री परमानंद पोतदार, शिवाजीराव खेसे, वंदना सोमठाणकर, सौ. ललिता कुलकर्णी, श्री दिगंबर बोपर्डीकर, गिरीश वसेकर, प्रमोद कुलकर्णी, शेषराव गायकवाड, अभिराम रोंगे, डॉ. गायकवाड, डॉ.प्रियांका निंबाळकर, सतीश खानझोडे यांचे विशेष सहकार्य लाभले.याप्रसंगी सांस्कृतिक समितीचे राम बेंद्रे शीतल करे उपस्थित होते. शिबिराबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले, दरवर्षी असेच शिबिर नित्यनेमाने व्हावे, अशी अपेक्षा नांदेड सिटीवासिय व्यक्त करीत होते.

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-३२



ज्योतिर्मय 'च्या हजारो-लाखो वाचकांपैकी अनेकांनी मला अनेक प्रकारच्या उत्सुकता वर्धक भावनांचे मेसेजेस् पाठवून, पुढे काय काय माहिती आहे? या बद्दल विचारणा केली आहे. मी अत्यंत नम्रपणे आपणां सर्वांना या ३२व्या 'लघुलेखा'व्दारे कळवू इच्छितो की, आपणांपैकी प्रत्येकालाच उत्तरे पाठविण्यासाठी मी मेसेजेस लिहायला बसलो तर, एक-दोन ... अगदी दहा-पंधरा पण ठीक आहे- परंतु अगदीच चारशे साठ किंवा अधिकच जिज्ञासुंना मेसेज पाठवणं केवळ कठीण काम आहे. तरी कृपया संबंधितांनी नाराज होवू नये, ही विनंती तर आहेच पण आणखीही अनेक मेसेजेस् आणि 'व्हॉइस् ॲप कॉल्स' मी घेऊ वा बघु शकलो नाही त्या साऱ्यांची क्षमा मागून साऱ्यांनाच या लेखाव्दारे माहिती देण्याचा प्रयत्न करतो आहे.

'वास्तुशास्त्र पेंटींग 'ही लघु लेखमाला सुरू करण्याचं काम मी सुरु केलं आहे. या लघु लेखमालेत किती लेख असु शकतील हे मला,आता तरी सांगणं कठीण आहे. मात्र, या विषयावर आवश्यक ती ती सर्व सर्व माहिती थोडक्यात देण्याचा विनम्र प्रयत्न मी जरूर करणार आहे. हे सर्व सहृद आणि जिज्ञासु सन्माननीय वाचकांना, त्यांच्या सर्वसामान्य मेसेजेसचं उत्तर आहे.

'वास्तुशास्त्र पेंटींग' ह्या शास्त्रीय रंगाकार उपचार पध्दतीतील मुख्य घटक म्हणजे नक्षत्रे, राशी, नक्षत्रांच्या विशिष्ट देवता, देवतांचे मंत्र, आराध्य वृक्ष, धार्योषधी आणि बरीच अशी माहिती प्राचीन, अति - प्राचीन असून संदर्भ ग्रंथांव्दारे मिळविलेली आहे. ती अनुभवांती सत्य आहे अशी माझी सुस्पष्ट आणि निःसंदिग्ध खात्री आहे.

आपण या पृथ्वीचे किंबहुना या ब्रह्मांडाचे एक भाग आहोत, आपण पंच महाभूतां पासून निर्माण झालेलो आहोत.याच पंच महाभूतांपासून हे विश्व निर्माण झालेले आहे. आपणा सर्वांमध्ये म्हणूनच ही पांच तत्वे भरलेली आहेत. 'अंत्यसंस्कार' झाल्यानंतर बातमी मध्ये खूप जणांना गांभीर्याने माहितीही नसते तरी ते बातमीचा मथळा लिहीतात. "ते, पंचत्वात / पंचतत्वात विलीन झाले" परंतु ते खरी आहे. ज्या पंचतत्वा ने आपणांस मानवी देह दिला, तोच देह आपण कांही वर्षे वापरून पुन्हा पंचतत्वांना परत करतो. मित्रहो हीच 'पंचतत्व' आपल्या 'वास्तुशास्त्र पेंटींग'चा 'गाभा' आहेत. या "पंचतत्वां"च्या रंगांच्या आधार आपले 'वास्तुशास्त्र पेंटींग' निर्माण होते, ते आपल्या जीवनाशी किती एकरूप असते....याचा आपणांस अंदाज आलाच असेल...

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## जात्यावरच्या ओव्या......

---


बाळ नवरदेव
वढदाच्या पारावरी
सोन्याची अब्दागीरी (छत्री)
मामा धरे भाच्यावरी ||२३५||

वडदाच्या वाटा
ढवळा घोडा, पिवळा वाणी
बंधवाचा अन् माझा
तोंडावळा बापावानी ||२३६||

---

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# श्री गणेशाला दुर्वा प्रिय का...?




ज्योतिर्मय साहित्य

ते ऐकून इंद्रही विचारात पडला.

त्याने आपला सेवक तिच्यासोबत देऊन तिला कुबेराकडे पाठवले. कुबेराने आपल्या परीने प्रयत्न करून पाहिला. त्याच्या भांडारातील सर्व सोने एका पारड्यात टाकले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. त्याने मग सर्व देवांना पाचारण केले. इंद्र, कुबेर, विष्णू, शंकर आदी सर्व देव पारड्यात बसले तरी दुर्वांचे पारडे जडच होते. यामागे नक्कीच काहीतरी अर्थ असणार ही जाणीव इंद्राला आणि श्री विष्णूला झाली. आणि ते आश्रयासह कौंडीण्य ऋषींच्या आश्रमात आले. त्यावेळी ऋषींनी त्यांना दुर्वांची महती कथन केली आणि सांगितले की गणेश हा त्रैलोक्याचा स्वामी असून त्याच्याहून किंवा त्याने धारण केलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा काहीही श्रेष्ठ नाही.



श्री गणेशाशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टी या प्रतिकात्मक आहेत. त्या प्रत्येक गोष्टीमागे काहीतरी संदेश आहे. अनलासुर हा राग, लोभ आदि षड्रिपूंचे प्रतिक आहे. त्याचा नाश गणपतीने केला. त्यांचा नाश करण्यासाठी किंवा देवतेला प्रसन्न करण्यासाठी तपश्चर्या करावी लागते. तपश्चर्या करताना अंगात उष्णता निर्माण होते. ती उष्णता कमी करण्यासाठी दुर्वांचा उपयोग होतो. दुर्वा या एकवीस का वाहाव्यात किंवा एकवीस या संख्येचे काय महत्व आहे ? तर पृथ्वीवर सात खंड आहेत. सात समुद्र आहेत. सात वार आहेत. शरीरातही सप्त धातू आहेत. विवाहातही सप्तपदी आहे. आणि सत्व, रज आणि तम हे तीन गुण आहेत. या साताला तीनने गुणले की उत्तर एकवीस येते. श्री गणेश हा सत्व, रज आणि तम या त्रिगुणांच्या पलीकडे असलेले दैवत आहे. कालही तीन आहेत. वर्तमान, भूत आणि भविष्य. श्री गणेश हा आदिदेव. तो या सगळ्यांच्या पलीकडे. पृथ्वी, आकाश आणि पाताळ हे ही तीन लोक तो व्यापून उरला आहे. मानवी शरीराच्या तीन अवस्था आहेत. जन्म, जरा आणि मृत्यू. अशा या सगळ्या प्रतीकात्मक गोष्टी.

दुर्वा या श्रीमंतापासून गरीबांपर्यंत सर्वांना सहज उपलब्ध होतील अशा आहेत. अलीकडे चांदीच्या दुर्वा पण श्री गणेशाला वाहिल्या जातात. पण खऱ्याखुऱ्या दुर्वाच श्री गणेशाला जास्त प्रिय आहेत. दुर्वा म्हणजे दिसायला गवत किंवा हरळी. पण त्यांचे महात्म्य मोठे. तेव्हा या गणेशोत्सवात गणपतीला प्रिय असणारे मोदक तर वाहू या, प्रसाद म्हणून भक्षण करू या पण दररोज कमीत कमी एकवीस दुर्वांची एक जुडी आणि प्रिय असणारे जास्वंदीचे फुल तरी श्री गजाननाला भक्तिभावे अर्पण करू या.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

बद्धाच्या अंगी कोणममती लक्षणे असतात?

काम, क्रोध, गर्व, मदमत्सर, हेवा, तिरस्कार, पाप करण्यासाठी सतत तयार असतात. वाईटकर्म, वाईटविकार, भेदाभेद क्रुरपणा

सतत समोरच्यानिंदा करणे.वाईट कर्माचा सतत विचार करून तेकरणे, भेदाभेद (भेदाभेद भाव अमंगळ)

सतत वादावादी करणे, निंदा अधर्म संपत्तीची अभिलाषा व ती जर मिळाली नाही तर सारासार

विचार नकरता हवे ते टोकाचे वाईट पाऊल उचलणे या


वाईट विचारांचा ऐवढा अतिरेक होतो की माणुसधर्म हा या लोकांच्या कडून विसरला जातो अशा अनेक दोषांचा अतिरेक म्हणजे बद्धलक्षण होय.

ओवी क्रमांक २८ च्या पुढेही काही गोष्टींचा आपण विचार करू भ्रष्टाचार, अनाचार, अनीती, अिूचार, निष्ठूरपणा, घातकीपणा,हिंस्त्रपणा, घातकीपणा, तापटपणा, कुविद्या, दुराशा, स्वार्थीपणा भांडणतंटे,

लहानसहान गोष्टीवरून अनर्थ काढत बसणे व समोरच्याला प्रचंड मनस्ताप सहन करावयास लावणे दावा धरणे, दुष्टबुद्धी कामना, वासना, ममता, भावना, विकल्प, विषाद, मूर्खपणा, प्रपंचातील वाचाळपणा, पाखंडीपणा दुर्जनपणा

थोतांडपणा, लबाडस्वभाव नास्तिकता, भ्रम, भ्रांति, अज्ञानाचा अंधकार, संशयी स्वभाव, आळशीपणा अतिशय कंजुसपणा, सतत लोकांना काही ना काही कारण काढून नावे ठेवत रहाणे, कोणत्याही गोष्टीचा साधकबाधक विचार न करणे त्याने काय होतं की स्वतः हा पण आडचणीत येतो व समोरच्याला नाहक त्रासाला सामोरं जावं लागतं हे सर्व बद्धलक्षणात मोडतं. **(क्रमशः)**

## नामाचे सूक्ष्म स्वरूप.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते ' राम राम ' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ' नोकरी नोकरी ' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ' रामनाम ' आणि ' नोकरी ' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ' राम राम ' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वत:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ' राम राम ' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ' नोकरी नोकरी ' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ' राम राम ' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा नोकरी नोकरी म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता 'राम राम' जपावे. मनाच्या सर्व दु:खाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. ' मी ' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

११. जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदु:खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**अकारणं दयालुत्वं कृपालुत्वं स्वभावजम्।**
**परमपूजनीयोऽयं पातु नः सर्वतोपरि।।५।।**

अकारण दयालुत्व आणि स्वाभाविक कृपालुत्व असणारा हा परमपूजनीय गणेश आमचे सर्वतोपरी रक्षण करो.

**अगाधमहिमाऽस्यास्ति वर्णये किमहं कथम्।**
**गायन्ति यत्र सर्वे हि द्युलोकस्थाः स्तवं शुभम्।।६।।**

याचा महिमा अगाध आहे. तो मी काय आणि कसा वर्णन करू; की, जेथे सर्व देव त्याची शुभ स्तवनं गातात.

**स्तुत्त्वा नत्त्वा जना यान्ति कुशलतां प्रवीणताम्।**
**मोरया मोरया घोषं कृत्त्वा धन्या भवन्ति ते।।७।।**

त्याची स्तुती करून, त्याला नमस्कार करून लोक कुशलतेला, प्रवीणतेला प्राप्त होतात. ''मोरया, मोरया'' असा घोष करून ते धन्य होतात.

**मुनीनां वचनं सत्यं कलौ चण्डिविनायकौ।**
**हासो नमति तं देवं सर्वविघ्नोपशान्तये।।८।।**

मुनींचे वचन सत्यच आहे की, कलियुगात चण्डीमाता व विनायकाची भक्ती करावी. सर्वविघ्नांच्या उपशमनासाठी चन्द्रहास त्या गणपती देवाला नमस्कार करतो.




## जखम झाल्यावर धनुर्वात प्रतिबंधक लस का देतात?

ज्योतिर्मय साहित्य

जखम झाल्यावर धनुर्वात होऊ नये, यासाठी सर्वच डॉक्टर धनुर्वात प्रतिबंधक लसीचे इंजेक्शन देतात.

टिटॅनस टॉक्साईड व टीटीचे इंजेक्शन का देतात, असा प्रश्न पडणे स्वाभाविकच आहे. जखम झाल्यानंतर त्यात रस्त्यावरची, घरातील, शेतातील माती वा इतर घाण जाऊ शकते.

धनुर्वाताच्या जिवाणूच्या बीजावस्था (स्पोर) असतात. हे जंतू विपरीत अवस्थेत जिवंत राहण्यासाठी बीजावस्थेत जातात या अवस्थेत ते उष्णता, कोरडेपणा यांना सहजगत्या तोंड देऊ शकतात. सुयोग्य वातावरण मिळाल्यास या बीजावस्थाचे रूपांतर धनुर्वाताच्या जंतूमध्ये होते.

हे जंतू मग एक भयंकर विष निर्माण करतात. या विषाचा परिणाम मेंदूवर व स्नायूवर होतो. यामुळे धनुर्वात या रोगात स्नायू कडक होणे, शरीराची कमान होणे, दातखीळ बसणे, झटके येणे अशा गोष्टी पाहावयास मिळतात.

या आजारात मृत्यूचे प्रमाण जरी आता खूप कमी झाले असले तरी, नवजात बालकांमध्ये मात्र मृत्यूचे प्रमाण ८० टक्के इतके आहे.

धनुर्वात होऊ नये, यावर एकमेव खात्रीलायक इलाज म्हणजे धनुर्वाताची लक्षणे ज्या विषामुळे दिसतात त्या विषाचा बीमोड करण्यासाठी प्रतिबंधक लस घेणे.

ही लस घेतल्यानंतर सुमारे २१ ते ३० दिवसांत आपल्या रक्तात धनुर्वाताच्या जंतूच्या विषाविरुद्ध कार्य करणारे प्रतिद्रव्य तयार होते. त्यामुळे धनुर्वात होणे टाळता येते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे: ती म्हणजे, आज घेतलेल्या लसीचा उपयोग महिन्या भरानंतर होतो. धनुर्वाताचा अधिशयन काल काही दिवसांचाही असू शकतो.

साहजिकच जखम झाल्यावर घेतलेल्या टीटीच्या लसीमुळे, त्या जखमेमुळे धनुर्वात होणार असेल तर फारसा उपयोग होत नाही. यासाठी काय करावे ?

लहान मुलांना दीड महिन्यापासून त्रिगुणीच्या लसी द्याव्या. एखाद्याने कोणतीच लस घेतली नसेल, तर महिन्याच्या अंतराने टीटीची दोन इंजेक्शने द्यावी. त्यामुळे त्याला धनुर्वातापासून ५ वर्षे संरक्षण मिळेल.

नंतर दर ५ ते १० वर्षांनी एक इंजेक्शन घ्यावे. अशा प्रकारे आपण केव्हाही होणाऱ्या जखमांपासून उद्भवू शकणाऱ्या धनुर्वाताचा प्रतिबंध करू शकतो.

शस्त्रक्रिया करण्यापूर्वी (शक्य असेल तेव्हा) बाळंतपणाच्या अपेक्षित तारखेच्या आधी सुमारे महिनाभर यासाठीच टीटीचे इंजेक्शन घेणे गरजेचे असते.

डॉ. अंजली दिक्षित व डॉ. जगन्नाथ दिक्षित यांच्या पुस्तकातुन

***

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

> कथा ऐकता ऐकता धावते संकलन
> मधुकर बोरीकर, 9403061886

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

(क्रमशः)

# जहाल क्रांतिकारक तारकेश्वर दस्तीदार

ज्योतिर्मय साहित्य

ब्रिटीश सरकारने भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील विशेषतः जहाल क्रांतीकारकांना केवळ फाशीच दिली नाही, तर फाशी आधी मानसिक-शारीरिक अमानुष छळही केला. मास्टर दा' म्हणून प्रसिद्ध असलेले सूर्य सेन आणि त्यांचे सहकारी तारकेश्वर दस्तीदार आणि कल्पना दत्ता या स्वातंत्र्यसैनिकांचा ब्रिटीशांनी तुरूंगात प्रचंड अमानुष छळ केला. याबद्दल अनेक साक्षी व माहिती उपलब्ध आहेत. १२ जानेवारी १९३४ रोजी सूर्यसेन आणि तारकेश्वर दस्तीदार यांना चितगांव तुरुंगात फाशी देण्याच्या आधी त्यांचे हातोड्याने दात आणि सांधे फोडण्यात आले. त्यांची सर्व नखे जबरदस्तीने उपसण्यात आली. शरीराचे सांधे मोडले आणि बेशुद्ध अवस्थेत फाशीच्या दोरीपर्यंत त्यांना फरफटत नेले. या छळाच्या वेदना इतक्या होत्या की, त्यांच्या मृत्यूच्या वेळीही शरीरावर व्रण होते आणि अक्षरशः हाडे झगळत होती. फाशी दिल्यानंतर दोघांची शवं त्यांच्या नातेवाईकांना देण्यात आली नाही. ''धातूच्या मोठ्या पेटीत बंद करून ही शवं बंगालच्या उपसागरात फेकण्यात आली''. त्यांच्या धार्मिक आणि मानवी हक्काचा पूर्ण अपमान केला गेला. मास्टर दा सूर्य सेन आणि तारकेश्वर दस्तीदार यांच्या छळाच्या या कहाणीला भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात काळा अध्याय म्हणूनच ओळखले जाते. तारकेश्वर दस्तीदार आणि मास्टर दा सूर्यसेन यांच्या बलीदानाच्या मागील कहाणी ही केवळ क्रांतीची नव्हे, तर अत्याचाराची आणि अमानुषतेचीही आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या या महान नायकांची स्मृती समाजामध्ये आजही ज्योतवत समजली जाते. तारकेश्वर दस्तीदार यांना फाशी दिले गेले तेंव्हा त्यांचे वय फक्त २३ वर्षाचे होते. त्यांच्या बलीदानामुळे भारतीय स्वातंत्र्य संग्रामाला प्रचंड उर्जा आणि तरुणांना प्रेरणा मिळाली.

तारकेश्वर दस्तीदार यांचा जन्म १९११ साली चितगांव येथील सरोआताली येथे आताच्या बांगलादेशात झाला. तेंव्हा संपूर्ण बंगाल प्रांत हा अविभाजित भारताचा भाग होता. वैद्य कुटुंबात जन्मलेल्या तारकेश्वर यांनी शालेय शिक्षण सरोआतील येथे घेतले. शिक्षण घेत असतानाच मास्टर दा सूर्य सेन यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या इंडियन रिपब्लिकन पार्टी आर्मी () या क्रांतीकारक गटाशी स्वतःला त्यांनी जोडून घेतले होते. १९३० मध्ये बॉम्ब बनवताना झालेल्या स्फोटात तारकेश्वर गंभीर जखमी झाले होते. पण त्यांनी आपला मास्टर दा सूर्य सेन यांच्याबरोबरील स्वातंत्र्यलढा चालूच ठेवला.



भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जहाल गटाने म्हणजेच इंडियन रिपब्लिकन आर्मीने चितगांव शस्त्रागारा वरील केलेला १८ एप्रिल १९३० चा हल्ला महत्वाचा मानला जातो. या हल्ल्याने ब्रिटीश पोलीसांचे धैर्य नष्ट झाले. एव्हढेच नव्हे तर या हल्ल्यानंतर ब्रिटीश सैन्यात व पोलीसात असलेले भारतीय सैनिक व पोलीस हे पुढील काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी अनुकुल होण्यास सुरवात झाली. तारकेश्वर दस्तीदार हे सूर्य सेन यांचे उजवे हात समजले जात. १८ एप्रिल १९३० रोजी तारकेश्वर यांनी चितगावच्या पोलीस शस्त्रागारावर छापा टाकण्यासाठी युवा क्रांतीकारकांच्या एका गटाचे मार्गदर्शन केले होते. १८ एप्रिल, २२ एप्रिल, २३ एप्रिल १९३० या काळात ब्रिटिश फौजेशी झालेल्या प्रत्येक संघर्षात तारकेश्वर आघाडीवर होते. पण ते या सेनेच्या हाती लागले नाहीत. पोलीस कमीशनर मिस्टर टेगार्ट यांच्या मोटार गाडीवर २५ ऑगस्ट १९३० रोजी बॉम्ब टाकण्याच्या नियोजनात ते आघाडीवर होते. या घटनेनंतर २६ ऑगस्ट १९३० रोजी कलकत्त्याच्या पोलीस ठाण्यावर बॉम्ब पडला व व त्याच दिवशी डाक्याचे पोलीस इन्स्पेक्टर जनरल मिस्टर लोमेन यांना ठार करण्यात आले. बंगालच्या भूमीवर पावलापावलावर बॉम्ब फुटत होते. या लढ्यामध्ये इंडियन रिपब्लीकन आर्मी या संघटनेच्या महिलाही समाविष्ट होत्या. कलकत्त्याचे प्रेसिडेंसी मॅजिस्ट्रेट श्रीयुत पी. एन. दत्त यांची १९ वर्षाची पुतणी शोभाराणी दत्त हीलाच गुप्त पोलीस अधिकारी पवित्रकुमार बोस यांच्या घरावर बॉम्बफेक करण्याबद्दल अटक करण्यात आली होती.

६ मे १९३० रोजी कलाटोपाल येथे तारकेश्वर दस्तीदार यांच्यासह मास्टर दा सूर्य सेन व इतर क्रांतीकारकांचा ब्रिटीश सैन्याशी संघर्ष झाला. यामध्ये देवीगुप्ता, मनोरंजन सेन, रजत सेन, स्वदेशराय, अमरेंद्र नंदी हे क्रांतीकारक शहीद झाले. त्यावेळेस काही क्रांतीकारकांना पकडण्यात यश आले व त्यांना एका स्पेशल ट्रिव्युनलसमोर जुलै १९३० रोजी आयोगासमोर उभे करण्यात आले. न्यायमंदीरात सर्वत्र सशस्त्र गुरख्यांचा पहारा होता. खटला चालू असतानाच २ सप्टेंबर १९३० रोजी पोलीस कमीशनर टेगार्ट यांनी चंद्रनगर येथे असलेल्या




क्रांतीकारकांवर हल्ला केला. दोन्हीकडून गोळीबार चालून चार व्यक्ती पोलीसांच्या हाती सापडल्या. या कालखंडात स्वातंत्र्यसैनिकांना व त्यांना मदत करणाऱ्या नागरीकांना भयंकर स्वरूपाच्या सरकारच्या दमननितीला तोंड द्यावे लागले. जिकडे तिकडे सशस्त्र सेना व पोलिसांचे पहारे लागले होते. कर्फ्यू होताच सैनिक अधिकाऱ्यांनी पब्लिक प्रॉसिक्यूटरची सुध्दा झडती घ्यावयास कमी केले नाही तर बाकीच्यांची कथा काय? पण इतके सगळे करूनही क्रांतीकारकांनी पोलीस इन्स्पेक्टर खानबहाद्दूर हसानुल्ला याच्यावर भर दुपारी रस्त्यावर गोळी डागून व पोस्ट ऑफीसवर यशस्वी दरोडा घालून क्रांती दमनाने मरत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध केले. ८ डिसेंबर १९३० रोजी बंगालचे जेल इन्स्पेक्टर जनरल लेफ्टनंट कर्नल एन. एफ. सिंप्सन यांना संघटनेच्या तीन बंगाली तरुणांनी ऑफिसमध्ये जाऊन पहारेकऱ्याला क्लोरोफॉर्मने बेशुद्ध करून सिंप्सन यांना ठार मारले. बंगालच्या अर्थसदस्याच्या खोलीवर गोळी झाडून ज्युडिशियल सेक्रेटरी वेल्सन याला जखमी केले. या तिघा बंगाली क्रांतीकारकांमधील सुधीर गुप्ताने आत्महत्या केली. विनय कृष्ण बोस यांचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. त्यांनीच डाक्याच्या इन्स्पेक्टर जनरलला ठार केले होते. तिसरे क्रांतीकारक दिनेश गुप्त याला ८ जुलै १९३१ रोजी फासावर चढविण्यात आले. तो केवळ वीस वर्षाचा होता.

(क्रमशः)

# अमेरिकेपुढे आशियाचे आव्हान : भारत-जपान मैत्रीचा सूर्योदय

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

त्याच्या सहकार्य व सहयोगामुळे भारत आणि जपान नव्या जगात एक नवा चमत्कार घडवू शकतील, असा प्रबळ विश्वासही पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला. भारताचा दृष्टिकोन संकुचित नसून, तो व्यापक आहे. मेक इंडिया फॉर द वर्ल्ड या भावनेने भारत आपल्या वस्तू व सेवांची निर्मिती करत आहे आणि त्यामुळे सबंध जगाची सेवा करण्याचा भारताचा संकल्प आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानची घोषणा अशी होती की जपान हा आशियाचा प्रकाशदाता, मुक्तिदाता आणि संरक्षक आहे. जपानच्या पॅन आशिया धोरणात त्यांच्या प्रभुत्वाचा विचार होता. पण, आता जग बदलले आहे. भारत व जपान हे दोघेही समतुल्य आशियाचे नेते आहेत. भारताने आता आपल्या अक्टिस्ट पूर्वेकडे पहा आणि कृती करा, या धोरणानुसार मुक्त स्वतंत्र आणि स्थिर हिंद प्रशांत क्षेत्राच्या विकासाचा संकल्प केला आहे. भारत आणि जपान या दोघांचाही आशियाच्या कल्याणावर आणि विकासावर भर आहे. अमेरिकेसारख्या एकल्ली आणि एकांगी ट्रम्प वादाला प्रतिशह देण्यासाठी भारत- जपान एकत्र येत आहेत आणि आशियाच्या नव्हे, तर सबंध जगाच्या सत्ता समतोलाच्या दृष्टीने भारत आणि जपान यांची युती महत्त्वाची आहे.




जपानचा अमेरिकेला प्रतिशह

पंतप्रधान मोदी यांच्या टोकियो दौऱ्या दरम्यान जपानने अमेरिकेला कसा प्रतिशह दिला, याचे एक अद्भुत उदाहरण समोर आले आहे. जपानने अमेरिकेसोबतचा ५४४ अब्ज डॉलर्सचा व्यापार करार रद्द केला आहे. त्याचे कारण असे की, जपान मधील शेतकरी अमेरिकेचा तांदूळ आपल्या देशात घेण्यास तयार नाहीत. जपानने अमेरिकेपुढे शरणागती पत्करू नये, नांगी टाकू नये अशी जपानी शेतकऱ्यांची भावना आहे. अमेरिकेसोबतचा मेगा डील जपानने अचानक का रद्द केला. जपानचे वाणिज्य सल्लागार रयोसे अकाजावा यांनी अमेरिका दौरा अचानक रद्द केला. जर जपान अमेरिकेत ५०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार असेल, तर अमेरिका केवळ पंधरा टक्के टेरिफ लावेल, असे आश्वासन देण्यात आले होते. अमेरिकेने दाखविलेले गाजर जपानने नाकारले आहे. आता या गाजराची पुंगी ट्रम्प यांना वाजवावी लागेल. ट्रम्प बेताल बडबडीमुळे हा करार जपानने रद्द केला आहे. त्यामुळे ट्रम्प यांचा तीळपापड होणे साहजिक आहे. अमेरिकेचा तांदूळ जपानच्या बाजारपेठेत येणे म्हणजे तेथील शेतकऱ्यांच्या पायावर कुऱ्हाड पडली असती. खुद्द



जपानमधला शेतकरी अमेरिकेविरुद्ध तीव्र भावनांचा एल्गार प्रकट करत आहे. त्यामुळे जपानला पडत्या फळाची आज्ञा घेऊन हा करार रद्द करावा लागला. येथे नरेंद्र मोदी यांचे शहाणपण लक्षात घेतले पाहिजे. त्यांनी भारतीय बाजारपेठेत अमेरिकेची घुसखोरी रोखून धरली आणि कुठल्याही प्रकारच्या कृषी कराराला भीक घातली नाही, हा भारताचा रोखठोक दृष्टिकोन जपानने सुद्धा अनुसरला आहे. जपानी लोकांना चिकट भात आवडतो आणि त्यांचा तांदळाशी असलेला संस्कृतिक बंध त्यांना सोडवत नाही. त्यामुळे अमेरिकन तांदूळ त्यांनी साफ नाकारला, हे विशेष म्हटले पाहिजे. गेल्या दोन वर्षापासून जपानमध्ये भारतीय तांदळाची आयात वाढली आहे. गेल्या वर्षी जपानने भारताकडून ५.७४ मिलियन डॉलर्स तांदळाची खरेदी केली होती. आता ही खरेदी दुप्पट होण्याची शक्यता आहे. जपानने अखेर ट्रम्प यांच्या खेळीला बळी न पडता वाटाण्याच्या अक्षता लावल्या, ही गोष्ट म्हणजे जपानची अमेरिकेचला गोड हुलकावणी म्हटली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुसद्देगिरीचा आणि कूट नीतीचा हा परिपाक आहे.

ड्रॅगनसोबत सावध मैत्री

पंतप्रधान नरेंद्र मोदी सियाचीन येथे एस. इ. ओ. शिखर परिषदेसाठी जात आहेत. भारत आणि चीन यांच्यातील मैत्रीचा बंध गेल्या वर्षभरापासून अधिक मजबूत झाला आहे. अमेरिकेच्या आशियाविरोधी धोरणाचा परिपाक म्हणजे जपान, चीन, रशिया यांची मैत्री होय. मैत्रीचा हा नवा त्रिकोण ट्रम्प यांची डोकेदुखी ठरू शकतो. या परिषदेस २० देशांचे व १० संघटनांचे प्रतिनिधी हजर राहणार आहेत. शाश्वत विकासावर या परिषदेत मंथन होणार आहे. अमेरिकेच्या टेरिफ युद्धाला जबरदस्त प्रत्युत्तर म्हणून मोदी यांची ही कूटनीती सबंध जगापुढे एक नवा संदेश देत आहे. सात वर्षानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे प्रथमच चीनच्या दौऱ्यावर जात आहेत. त्यांच्या नेतृत्वाभोवती चिनी लोकांच्यामध्ये कमालीचे आकर्षण व तेजोवलय आहे. ज्या पद्धतीने त्यांनी भारतामध्ये अद्भुत आर्थिक प्रगती घडवून आणली, दारिद्र्याचे निर्मूलन केले आणि विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला एक मोठी गरूडझेप प्राप्त करून दिल्यामुळे सामान्य चिनी माणूस मोदी यांना पाहण्यासाठी व ऐकण्यासाठी उत्सुक आहे.

अमेरिकेने भारताविरुद्ध आयात शुल्क दुप्पट केल्यामुळे निर्माण झालेल्या चिंतांच्या पार्श्वभूमीवर मोदी यांची ही चीनभेट कूटनैतिक आणि मुत्सद्देगिरीच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे. अमेरिकेच्या स्वार्थी डावपेचांना प्रतिशह देण्यासाठी भारताची नवी व्यूहरचना अत्यंत महत्त्वपूर्ण असून, त्यामुळे संबंध आशिया खंडात आणि दक्षिणेकडील जगात भारताचे वर्चस्व आणि दबदबा यात वाढ झाली आहे. मायकेल कुबेलमन यांच्या मते भारताचा अमेरिकेवरचा विश्वास पूर्णपणे उडाला आहे आणि हा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी अमेरिकेला कोणती मेहनत करावी लागेल, हे आज सांगता येत नाही.

समारोप

पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांचा जपान व चीन दौरा ही जगाच्या राजकारणातील सत्ता समतोलाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना म्हटली पाहिजे. लोकशाहीप्रधान अमेरिकेने लोकशाहीप्रधान भारताला केवळ आर्थिक स्वार्थापोटी दूर लोटले आणि ट्रम्प यांच्यापुढे अनेक समस्यांची मालिका उभी आहे. भारत ही तर जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था आहे आणि भारतातील मध्यमवर्ग हा जगात सर्वात मोठा आहे. आता अमेरिकेच्या डावपेचांना भारत पुरून उरत आहे. भारताचा मागील तीन महिन्याचा जीडीपी ७.८ टक्के एवढा झाला आहे आणि ताज्या माहितीनुसार जगातील खरेदी शक्तीच्या नियमकांचा विचार करता आता भारत जगातील दुसरी अर्थव्यवस्था बनला आहे म्हणजे चीन आणि भारत हे जगातील खरेदी क्षमता असलेले दोन महत्त्वाचे देश बनले आहेत आणि भारताने अमेरिकेलाही मागे टाकले आहे. एका नंतर एक जगाला धक्के देत भारत पुढे दमदारपणे वाटचाल करत आहे. कृषी क्षेत्र असो, औद्योगिक आघाडीवरची वाटचाल असो, की उच्च शिक्षण आणि संशोधन तसेच माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम प्रज्ञा या क्षेत्रांतसुद्धा भारताची जोरदार आगेकूच चालू आहे. नुकताच सेमीकंडक्टर क्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण प्रकल्प प्रत्यक्षात कृतीत येण्यास सुरुवात झाली आहे आणि पुढील सहा महिन्यांत भारतामध्ये सहा ठिकाणी सेमीकंडक्टर उत्पादन सुरू होईल, तेव्हा भारताने आणखी एक मोठा टप्पा गाठलेला असेल. जपानचे भारताला सेमीकंडक्टर क्षेत्रात मोठे साहाय्य होणार आहे. अंतराळ संशोधनात भारताच्या गगनयान मोहिमेत जपान सहभागी होणार आहे. चीन, रशिया आणि भारत या सर्वांनी मिळून आशियाच्या प्रभुत्वाची साक्ष पटविली आहे. विशेषतः २१ वे शतक हे आशियाचे शतक आहे. भारत, जपान आणि चीनचे शतक आहे. त्यामुळे अमेरिकेच्या वर्चस्वाला भारताने जबरदस्त प्रतिशह दिला आह, हे या नव्या समीकरणाचे खरेखुरे सूत्र आहे. त्यातच भारताच्या कूटनीती आणि मुत्सद्देगिरीचा प्रत्यय येतो. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात म्हटले होते की, राज्याचे सात अंग जेव्हा मजबूत असतात, तेव्हा देश जगावर प्रभुत्व गाजवू शकतो आणि तसे करताना देशाचे हितसंबंध जपणे सर्वात महत्त्वाचे असते. समोरचा शत्रू किती मोठा आहे, याच्यापेक्षा त्याला आपण युक्तीने कसे पराभूत करू शकतो, यातच खरे शहाणपण असते आणि पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी हे आता विश्वगुरूचा नवा साक्षात्कार टोकियो आणि बीजिंगमध्ये घडवीत आहेत, यात शंका नाही.

***






# आधी वंदू तूज मोरया...

## ।। टिटवाळ्याचा -महागणपती ।।

**ज्योतिर्मय साहित्य**

अष्टविनायकांचे स्थाना शिवाय महाराष्ट्रात जी गणपतीची काही प्रमुख मंदिरे आहेत,त्यात टिटवाळा येथील महागणपतीचे मंदिराचा समावेश आहे. पुण्याहून साधारणपणे दीडशे कि.मी.आहे.कल्याण हून रिक्षा,टँक्सी,टांगा, वाहनाची उपलब्धता असते. टिटवाळा मंदिर आहे ,येथे पूर्वी कण्वऋषींचा आश्रम होता. शकुंतलेने याच महागणपतीची पूजा केली असे सांगितले जाते आणि म्हणुनच या महागणपतीस विवाहविनायक असेही म्हटले जाते.

कल्याण तालुका,जिल्हा -ठाणे, कल्याण-कसारा मार्गावर काळूनदीच्या काठावर असलेले हे देऊळ प्राचीन असून याची मूळ बांधणी शकुंतलेने केली असल्याची आख्यायिका आहे. हे देउळ एका सरोवरात बांधलेले होते. यात गाळ साचून देऊळ पूर्णपणे गाळात बुजले गेले, व सरोवरही नावाने राहिले. माधवराव पेशवे यांच्या राज्यात पडलेल्या दुष्काळ परिस्थितीत पाणी साठवण्याची सोय करण्यासाठी सरदार रामचंद्र मेहेंदळे यांनी या तळ्याचे उत्खनन केले. त्या उत्खननात हे देऊळ जसेच्या तसे सापडले व देवाची मूर्तीही अभंग स्वरूपात मिळाली. वसईची लढाई जिंकल्यावर माधवराव पेशव्यांनी या देवळाचे नूतनीकरण केले. व मूर्तीची स्थापना केली. त्याचवेळी देवळासमोर लाकडी सभामंडप बांधला. १९९५-९६मध्ये या सभामंडपाचेहि नूतनीकरण केले .

या गणपतीच्या आशीर्वादाने मुला-मुलींचे विवाह लवकर जुळतात अशीही श्रद्धा आहे.या महागणपतीस विवाह विनायक असेही म्हणतात. सभामंडपात एक चांदीचा उंदीर आहे या उंदराच्या कानात आपली इच्छा सांगतात. शनिवार, रविवार आणि मंगळवारी तसेच संकष्टी, विनायकी,चतुर्थीला भाविकांची गर्दी असते.अनेक भाविक येथे नारळाची तोरणं बांधतात.

श्री महागणपती टिटवाळा गणपती इच्छापूर्ती गणेश म्हणून प्रसिद्ध आहे. त्यातही, याच्या आशीर्वादाने इच्छुक वर वधु प्राप्ती होते,लग्न जुळतात, अशी श्रद्धा आहे म्हणून या गणपतीच्या भक्तांमध्ये तरुण तरुणींची संख्या जास्त असते.

मंदिर तेजस (काळू) नदीच्या काठावर आहे. साडेतीन फूट उंचीची मूर्ती शेंदुराने माखलेली आहे. डोळे व नाभी स्फटिक मण्यांनी मढवलेली आहे. मूर्तीच्या चरणाशी यक्ष-गंधर्व व डाव्या उजव्या बाजूला रिद्धी सिद्धी आहेत. मूर्ती डाव्या सोंडेची आहे.



पुराणकाळात राजा दुष्यन्ताला शकुंतलेची विस्मृती झाल्यानंतर कण्व मुनींनी या गणेशाची स्थापना करून शकुंतलेला गणपतीची उपासना करण्यास सांगितले. शकुंतलेने त्याप्रमाणे उपासना केल्यानंतर ती दुर्वास ऋषींच्या शापातून मुक्त झाली. राजा दुष्यन्ताला तिची आठवण झाली आणि शकुंतला- दुष्यन्ताचे पुन्हा मीलन झाले, अशी आख्यायिका सांगतात. या मंदिराला छत्रपती शिवाजी महाराज, आणि माधवराव पेशवे यांनीही भेट दिल्याचे सांगतात.

दुर्वास ऋषींचे यथायोग्य स्वागत न केल्यामुळे शकुंतलेला शाप मिळाला आणि राजा दुष्यंताला शकुंतलेचा विसर पडला. उत्साहाने पतीगृही गेलेली नवीन शकुंतला त्यामुळे आल्या पावली परत फिरली. कण्व ऋषींकडे परत आलेल्या या शकुंतलेने गणपतीची आराधना केली आणि दुष्यंताला सारे काही आठवले. शकुंतलेला तिचे प्रेम परत मिळवून देणारा गणपती म्हणजेच टिटवाळ्याचा महागणपती.

महाराष्ट्रातल्या अष्टविनायकांप्रमाणेच हे श्रीगणपती क्षेत्रही प्रसिद्ध आहे. याच परिसरात पूर्वी कण्व ऋषींचा आश्रम होता. शकुंतला इथेच वाढली.

त्यामुळेही या ठिकाणाला एक प्राचीन महत्त्व आहे.

गणपतीचे मंदिर तसे साधेच आहे. शेंदरी रंगाची रेखीव मूर्ती मंदिरात प्रवेश करताच आपले लक्ष वेधून घेते. रेखीव चेहरा, पुढे आलेली सोंड यामुळे मूर्तीला एक ठसठसीतपणा आला आहे. सिंहासनावर बसलेल्या अवस्थेतील ह्या मूर्तीच्या चार हातात आयुधे आहेत. मूर्तीला रोज नेटकेपणाने पितांबर नेसवला जातो. डोक्यावर चांदीचा मुकुट आहे. मुर्तीवर चांदीचेच छत्र आहे. इथे फुलांची सुरेख आरस केलेली असते. ही गणपतीची मूर्ती गाभाऱ्यात प्रवेश केल्यापासून आपली नजर खिळवून ठेवते. त्यामुळे आपण आजूबाजूला बघण्याचेच विसरुन जातो. जेथे गणपतीची मूर्ती आहे तो संपूर्ण देवारा चांदीचा बारीक कलाकुसर केलेला आहे.. गाभारा आणि सभा मंडप मध्ये जाळी लावून वेगळे केले आहे. गाभाऱ्याच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या दाराने बाहेर पडून आपण सभा मंडपात पोहचतो. इथे तालात,सुरात गणपती, अर्थवशीर्षाची आवर्तनं सुरू असतात. सत्य विनायक, गणेश याग इत्यादी भक्तांनी बांधलेल्या पूजा सुरू असतात. त्यांचा एकत्रित ऐकू येणारा नाद मनाला शांती देऊन जातो.प्रसन्नता वाटते.




या मंदिराचे वैशिष्ठ्य म्हणजे गाभाऱ्यात प्रवेश केल्यापासून ते सभा मंडपातून बाहेर पडेपर्यंत मूर्तीचे सतत दर्शन आपल्याला होत असते. मंदिराच्या आवारात एक छोटी दिपमाळ आहे. या मंदिरापासून काही अंतरावर एक तलाव आहे. हा एकंदर परिसरच खूप रमणीय आहे.

महागणपतीचे दर्शनाने मनाला शांती,समाधान मिळते हे नक्कीच. आपणही याचा अनुभव घ्यावा.

ॐ गं गणपतये नमः

# महा-लेखनिक गजानन

**ज्योतिर्मय साहित्य**

''ॐ गं गणपतये नमो नमः''

नमस्कार मैत्रांनो!

गणपतीउत्सवाचा आनंदसोहळा आपण साजरा करीत आहोत. चांगले दहा दिवस बालगणेशाचा हा लाडाकोडाचा कौतुकसोहळा सुरु आहे. आरास काय, गाणी काय, रोज सकाळ संध्याकाळ विविध नैवेद्य काय! उद्दिष्ट एकच! बुद्धीचे दैवत गजाननाला प्रसन्न करणे! सद्बुद्धीचा सदुपयोग करीत जगातील जे जे म्हणून मंगल आहे ते आपल्या जीवनात प्रवेश करील याची आपल्याला खात्री आहे. म्हणूनच तर आपण हक्काने त्याला साकडं घालतो ''दाता तू गणपती गजानन!'' आपण सर्व जाणतो की आपला प्रिय गजवदन प्रत्यक्ष बुद्धीचा देव आहे. मात्र त्याला एकदा चक्क लेखनिक व्हावे लागले. म्हणजे या बुद्धिवंताला एका अन्य व्यक्तीने सांगितलेली स्क्रिप्ट पुरातनकालीन पद्धतीप्रमाणे बहुदा भूर्जपत्रावर लिहावी लागली. या सर्व देव देवतांद्वारे अग्रमानांकित असलेल्या गणेशाला हे कार्य करायला भाग पाडणारे दुसरे तिसरे कुणी नसून वेदव्यास होते. तसेही ऋषीमुनींची विनंती देवादिकांसाठी आज्ञाच असायची.

तर झाले असे की महर्षी वेदव्यासांना त्यांच्या सकल जीवनाचे कडू गोड अनुभव एका महाकाव्याच्या रूपात रचायचे होते. त्याचे नामकरण त्यांनी 'जय संहिता' असे केले होते. (मात्र हा ग्रंथ पूर्ण झाल्यावर त्याचे नाव बदलून 'महाभारत' असे ठेवल्या गेले.) तर हे असे महाकाय काव्य रचण्याचे कार्य हाती घेतल्यावर आपल्या मर्यादित कार्यक्षमतेची वेदव्यासांना जाणीव झाली. ''मी विचार करीत करीत श्लोक लिहीन ! परत दुसरा श्लोक... अरे देवा ! माझी सारी शक्ती लिहिण्यात खर्च केल्यावर मला नंतरचा श्लोक रचण्याची शक्ती कुठून येणार?'' असा पेच पडल्यावर व्यास मुनी ब्रह्मदेवाची प्रार्थना करू लागले. ''हे विधात्या, कुणी आहे कां जो माझे श्लोक मी सांगितल्यावर तात्काळ लिहून घेईल? मला ना माझे महाकाव्य पुरे करण्यासाठी आपण एक कार्यकुशल लेखनिकाची व्यवस्था करावी.'' आता वेदव्यासांच्या बुद्धिमत्तेची पूर्ण कल्पना असलेले ब्रह्मदेव विचारात पडले. सर्व देवांचा बायोडाटा त्यांच्याजवळ होताच. त्यांनी वेदव्यासांना आज्ञा केली, ''कैलास पर्वतावर शिवपार्वतीचा पुत्र गणेश हे तुझे कार्य सिद्धीस नेईल असा मला विश्वास आहे. तू त्याला विनंती कर.''



त्यांच्या आज्ञेनुसार व्यास मुनींनी गजाननाची आराधना केली. त्यांच्या तपस्येने प्रसन्न झालेल्या श्रीगणेशाने प्रकट होऊन त्यांना शुभाशीर्वाद दिला. मग महर्षी व्यासांनी श्रीगणेशाकडे आपली इच्छा प्रकट केली. व्यासांची ही विनंती ऐकल्यावर गणेशाने त्यांना एक अट घातली. ''मी एकदा लिहायला बसलो की तुमच्या सांगण्यात सातत्य हवे. मध्ये मध्ये विश्रांती घ्यायची नाही. नाही तर माझी एकाग्रता भंग झाली की हा मी चाललो परत कैलासाला!'' महत्प्रयासाने प्राप्त झालेल्या या महान लेखनिकाचे म्हणणे मान्य करण्याशिवाय व्यासांना गत्यंतर नव्हते. आता अट घालण्याची पाळी व्यासांची होती. ते म्हणाले, ''हे गणेश देवा! माझीही आपल्याला अट आहे की समजून पूर्ण आकलन झाल्याशिवाय आपण लेखन करू नये. अर्थात श्लोकाचा पूर्ण अर्थ समजून उमजून मगच आपण लेखन करावे.'' (मंडळी, आजकालच्या विद्यार्थ्यांना डोके न वापरता नोटस काढण्याची सवय आहे त्याकरता बघा किती पुरातन तोडगा आहे.) गणेशाने ही अट मान्य केल्यावर आता व्यासांचे श्लोक सांगणे आणि गणेशाचे लेखन जोरात सुरु झाले. व्यासांच्या लवकरच लक्षात आले की गणपतीला सर्व श्लोक समजण्यास कांही क्षणांचा अवधी पुरे आहे. आता काय करावे बरे? मग व्यासांनी आपले श्लोक क्लिष्ट करण्यास सुरुवात केली केले. मध्ये मध्ये ते म्हणे गणेशाला कोडी सुद्धा घालत. या गोष्टी समजायला गणपतीला थोडा अधिक वेळ लागे आणि तितक्या वेळात व्यास पुढील श्लोकांचा विचार करून ठेवत. अशा रीतीने हे महाभारत नामक एक लाख श्लोकांचे महाकाव्य निर्माण झाले. म्हणूनच असे म्हटल्या जाते की जे महाभारतात आहे ते आणि तेच या जगात आहे. कां बरे? व्यासांचा विराट व्यासंग, प्रज्ञा, कल्पकता आणि अनुभव कथन या सर्वांना बुद्धिदाता गणेशाचा त्याच्या लेखणीच्या रूपात आशीर्वाद लाभला!



डॉ. मीना श्रीवास्तव
पुणे. मो. 99201 67211

मैत्रांनो, आजही भारतातील उत्तराखंडमधील बद्रीनाथ शहराजवळील माना गावात गणेश गुफा आणि व्यास गुफा आहेत. असे मानले जाते की व्यास गुफा ही तीच गुहा आहे जिथे महर्षी वेदव्यासांनी महाभारताची रचना केली. या गुहेजवळच गणेश गुफा आहे जिथे व्यासांच्या श्रुतलेखनाला अनुसरून भगवान गणेशाने महाभारत हे महाकाव्य लिहिले.

विघ्नहर्ता श्रीगजानन आणि महाकवी महर्षी वेदव्यास या दोघांच्या चरणी विनयपूर्वक नमन!

# गणेशोत्सव : टिळकांच्या प्रेरणेपासून 'राज्य महोत्सव'पर्यंतचा प्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

**कला, नेतृत्व व समाजप्रबोधनाचे व्यासपीठ**

गेल्या शंभर वर्षांत गणेशोत्सवाने हजारो कलाकार, कवी, नकलाकार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, शिल्पकार यांना व्यासपीठ दिले. सामाजिक समस्यांवर देखावे, शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक मूर्ती यांमुळे या उत्सवात जागरूकता आणि प्रबोधन घडते. गणेशोत्सव हे नेतृत्व विकसित करणारी शाळाच म्हणावी लागेल. स्वयंसेवकांचे संघटन, व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन या सर्व गोष्टी किशोरवयातील शाळकरी मुलांना,तरुणांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देतात.

**महाराष्ट्र शासनाचा निर्णय : राज्य उत्सवाचा दर्जा**

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २०२५ पासून गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे.

सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी विधिमंडळात १८ जुलैला या संदर्भातील घोषणा केली आहे. हा निर्णय घेताना राज्य शासनाने सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव तसेच प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनाही कार्य विभागून दिले आहेत.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर,**
**९७०२८५८७७७**

राज्य शासनाने आपल्या शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यांसाठी एकत्रित आणणे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयाचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे.

राज्य महोत्सव अंतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करण्याचे नियोजनही राज्य शासनाने केले आहे.राज्यस्तरीय सोहळा आयोजित करण्याची जबाबदारी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला दिली आहे. विविध स्पर्धांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

**पर्यावरणपूरकतेला प्राधान्य :**

राज्य महोत्सवामुळे गणेशोत्सवातील विधायकतेला महत्त्व आले आहे. राज्य शासनाने या उत्सवात आपला सहभाग अधिक सक्रिय केल्यामुळे आता ध्वनी, वायू, जल प्रदूषण विरहित परिसर, एक गाव एक गणपती सारख्या उपक्रमाला प्रोत्साहन, या सोबतच पर्यावरण पूरक मूर्ती पर्यावरण पूरक सजावट व आयोजनातून पर्यावरणाला कोणताही धोका होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाडू मातीच्या मूर्ती, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, हरित उत्सव अशा उपक्रमांना शासनाचे सहकार्य दिले जात आहे.

शिल्पकार, नृत्य, नाटक, संगीत, चित्रकला या क्षेत्रांतील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजना राबवण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत भजनी मंडळांना अनुदान, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या गणेश उत्सवांना प्रोत्साहन हे कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये जिल्हाधिकारी यांना देखील अधिकार देण्यात आले आहे. गणेश महोत्सवासाठी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहे.यामुळे सर्व गणेश मंडळांशी जिल्हाधिकाऱ्यांचा अधिक व्यापक संपर्क होणार असून या महोत्सवाची सार्वजनिकता, सार्वजनिक उपयुक्तता व पर्यावरण पूरकता वाढविण्यात येत आहे. या निर्णयामुळे गणेशोत्सवाची परंपरा मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या ओळखीचा आणि अभिमानाचा उत्सव म्हणून गौरविला गेला आहे.

**महाराष्ट्राबाहेर गणेशोत्सव**

कधीकाळी केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित असलेला हा उत्सव आज देशभर पसरला आहे. अनेक देशातही हा महोत्सव पोहचला आहे. कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली अशा ठिकाणी मराठी समाजाच्या प्रेरणेने गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरा होतो. विशेष म्हणजे, मुंबई वा पुण्यात राहणारा इतर राज्यातील कामगार, व्यापारी किंवा कर्मचारी हा उत्सव अनुभवतो आणि आपल्या गावी जाऊन त्याची परंपरा नेतो. अशा प्रकारे गणेशोत्सवाने राष्ट्रीय स्तरावर सामूहिकतेचे बंध निर्माण केले आहेत.

लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, हे गणेशभक्तांसाठी अभिमानाचे पाऊल आहे. गणेशोत्सव आता केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता, तो कला, संस्कृती, समाजजागृती, नेतृत्व आणि आर्थिक चैतन्याचा अविभाज्य भाग बनला आहे. टिळकांचा हा वारसा आज राज्याच्या गौरवाचा उत्सव बनला आहे, त्यामुळे खऱ्या अर्थाने गणपती बाप्पा मोरया!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559